CMYK

सुविचार

ज्ञानाची खरी परीक्षा त्याचा योग्य वापर करण्यात आहे.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 163 ■ गुरुवार, दि. 24 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5




इन्स्टाग्राम व ऑनलाइन चॅटमुळे सुखी संसारात पडतोय मिठाचा खडा

पेज 4

# प्रसाद सेवा की धंदा ? केवळ ५० ग्रॅम लाडूसाठी ३० रुपये!

## भाविकांना महागड्या दराने मिळणार चितळेंचे लाडू,उद्यापासून विक्री सुरु

### मंदिर संस्थानच्या निर्णयावर भाविकांत नाराजी

आरंभ मराठी | तुळजापूर

**श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे शुक्रवारी सकाळी 'प्रसाद सेवे'चा शुभारंभ होणार आहे. मागणी पेढ्याची असताना मंदिर संस्थानने पुण्यातील चितळे मिठाई वाल्यांकडून लाडू खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्यक्षात या सेवेच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले असून, भाविकांत व पुजारी वर्गात तीव्र नाराजीचे वातावरण आहे.**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे शुक्रवारी सकाळी 'प्रसाद सेवे'चा शुभारंभ होणार आहे. मागणी पेढ्याची असताना मंदिर संस्थानने पुण्यातील चितळे मिठाई वाल्यांकडून लाडू खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्यक्षात या सेवेच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले असून, भाविकांत व पुजारी वर्गात तीव्र नाराजीचे वातावरण आहे. संस्थानतर्फे जाहीर करण्यात आलेल्या माहितीनुसार, या प्रसाद सेवेअंतर्गत भाविकांना ५० ग्रॅमचा एक लाडू ३० रुपयांना विकत घ्यावा लागणार आहे. विशेष बाब म्हणजे, चितळे मिठाईवाले हे लाडू मंदिर संस्थानला प्रति लाडू २८.५० रुपयांना पुरवणार आहेत, म्हणजेच संस्थान फक्त १.५० रुपये दर लाडू नफा कमावणार आहे. हे लाडू संस्थानचे कर्मचारी मंदिर परिसरात विक्रीसाठी ठेवतील.

मात्र, या संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, भाविकांनी 'प्रसाद' हे श्रद्धेचे प्रतीक असल्याने, त्याची विक्री न करता तो किमान नाममात्र दरात किंवा मोफत द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शिवाय, मूळ कल्पना ही पेढा वाटपाची होती, कारण पेढा टिकावू, शुद्ध व वाहून नेण्याजोगा असतो. मात्र, पेढ्याऐवजी लाडू देण्याचा निर्णय नेमका कशाच्या आधारे घेण्यात आला ? यावर संस्थान मौन बाळगून आहे. पेढ्याचा प्रसाद देण्याचा निर्णय घेतला असता तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खव्याच्या माध्यमातून रोजगार मिळाला असता. यासंदर्भात आरंभ मराठीने पुजारी तसेच भाविकांची बाजू मांडली होती.





### पुजारी वर्गाची नाराजी

मंदिरातील अनेक पुजारी व सेवेकरी वर्गाने हा निर्णय भक्तांच्या श्रद्धेच्या भावना दुखावणारा असल्याचे सांगितले आहे. ''प्रसाद विकत घेण्याची भावना ही मंदिरांच्या परंपरेशी विसंगत आहे. मंदिर हे व्यावसायिक केंद्र नव्हे; तिथे सेवा भाव असावा, विक्री नव्हे,'' असे एका ज्येष्ठ पुजाऱ्याने नाव सांगितले.

### कारभारावर प्रश्नचिन्ह

या प्रकरणात मंदिर संस्थानचा पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो.भाविकांना कोणत्या आधारावर लाडू द्यायचे ठरवले गेले, निविदा प्रक्रिया किती खुली होती, किंमतीचे निर्धारण कसे झाले, या सर्व बाबींवर अजूनही उत्तर मिळालेले नाही. भाविकांच्या पैशातून चालणाऱ्या संस्थानला संवेदनशीलता आणि पारदर्शकतेचे पालन अपेक्षित आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

### २० रुपयांना लाडू

३० रुपयांत एक लाडू विकणे म्हणजे भावनांची विक्री असल्याची भावना लोकांमध्ये उमटू लागली आहे. त्यात पुन्हा केवळ ५० ग्रॅम वजन असल्यामुळे तेही अतिशय महाग वाटत आहे.बाजारात मिठाईच्या दुकानात ५० ग्रॅम लाडू १३ ते १५ रुपयांत विकत मिळतो. तुपातल्या लाडूचा दर ३० रुपये इतका आहे. इकडे चितळेंचे लाडू महागड्या दराने खरेदी करण्याचा उद्देश काय, लाडूचा हट्ट कुणासाठी, इतक्या महागात लाडू भाविकांना देऊन मंदिर संस्थान नेमके काय साध्य करू इच्छित आहे,याची उत्तरे मिळणे अपेक्षित आहे.

### ३ ठिकाणी काउंटर, दररोज २० हजार लाडू

चितळे मिठाई वाल्यांकडून मंदिर संस्थानला दररोज २० हजार लाडू दिले जातील. मागणीनुसार त्यात बदल होईल. मात्र, २८.५० रुपये दराने दिलेल्या या लाडूची मंदिर संस्थानच्या वतीने एकूण ३ काउंटरवरून ३० रूपाने विक्री केली जाणार आहे.वास्तविक, तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणारा भाविक सर्वसामान्य वर्गातला आहे. भाविकांना नाममात्र दरात प्रसाद द्यायला हवा होता.मात्र, मंदिर प्रशासनाने महागातला व्यापार सुरूकेलाआहे.

# जिल्ह्यात डिसेंबर अखेर १,३०० उद्योजकांना अर्थसहाय्य, बँकांना उद्दिष्ट

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे निर्देश



आरंभ मराठी | धाराशिव

मागील तीन वर्षापासून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत आपला जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. ठरवून दिलेले उद्दिष्ट मागील तीन वर्षांपासून आपण सातत्याने पूर्ण केले आहे. शेकडो तरुणांना यातून हक्काचे उद्योग उभारता आले आहेत. चालू वर्षात डिसेंबर अखेर आणखी १३०० नव्या उद्योजकांना आर्थिक सहकार्य करण्याचे उद्दीष्ट ठरवण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व बँकांनी यंदाही आपला जिल्हा राज्यात अव्वल क्रमांकावर कायम ठेवण्यासाठी निर्धारित करण्यात आलेले उद्दिष्ट डिसेंबर पर्यत पूर्ण करावे, असे आवाहन मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

मंगळवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम तसेच विविध आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजना व प्रकल्पासाठी देण्यात येणाऱ्या कर्ज वितरणाबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्ह्याचे अग्रणी बँक व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक, तसेच सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक, सर्व महामंडळांचे अधिकारी उपस्थित होते. सध्या जिल्हा उद्योग केंद्रातून एकत्रित २५० प्रकरणे मंजूर केली जातात. मात्र, त्यामुळे सुरुवातीला मंजुरीसाठी प्रकरण दाखल केलेल्या अर्जदारांना मंजुरी मिळण्यास खूप उशीर होतो. त्यामुळे आता २५ प्रकरणे दाखल होताच त्वरीत मंजुरी देण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सर्व महामंडळांनी आपापल्या योजनांतर्गत कर्जवाटपाचे उद्दिष्ट वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बँकेची रिकव्हरीची अडचण समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याबाबत देखील यावेळी चर्चा झाली. यावेळी सर्व महामंडळांकडून कुठल्या योजनेअंतर्गत किती जणांना मदत करण्यात आली याची सविस्तर माहिती मागवण्यात आली होती. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना इन्शुरन्सच्या माध्यमातून मदत करण्यासंबंधी राबवल्या जात असलेल्या प्रभावी उपाययोजनांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. चालू वर्षासाठी जिल्ह्याला अर्थात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती (सीएमईजीपी) कार्यक्रमांतर्गत १,३०० नवीन उद्योजक उभे करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. २०२२ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत हा उपक्रम सुरू केला होता. त्यातून हजारो युवकांनी स्वतःचे उद्योग उभारले आहेत. जिल्ह्यातील बँकर्सना डिसेंबर २०२५ वर्षात नवीन लक्ष देण्यात आले आहे. धाराशीव जिल्ह्यातील विविध सरकारी महामंडळ योजनांअंतर्गत प्रस्तावांचा मागोवा ठेवण्यास मदत करणारे पोर्टल विकसित करण्यासाठी दिशादर्शक प्रकल्प सुरू केला जाऊ शकतो.

# शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच शक्तीपीठ महामार्गाचे काम होणार

## आमदार राणा पाटील

आरंभ मराठी | धाराशिव

शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच धाराशिव जिल्ह्यातील शक्तीपीठ महामार्गाचे काम करण्यात येणार असल्याचे मित्र संस्थेचे उपाध्यक्ष आमदार राणा पाटील यांनी स्पष्ट केले. धाराशिव जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकऱ्यांनी मोर्चेबांधणी केल्यानंतर आमदार राणा पाटील यांनी मागील महिन्यात बाधित शेतकऱ्यांची एक बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या होत्या. यावेळी आमदार राणा पाटील यांनी शेतकऱ्यांना स्पष्ट शब्द दिला आहे की, जोपर्यंत त्यांना योग्य वाटत नाही तोपर्यंत शक्तिपीठ महामार्गाचे काम होणार नाही. धाराशिव जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी महामार्गासाठी संमतीपत्र दिल्याचीही माहिती पाटील यांनी दिली. प्रत्येक गावामध्ये जाऊन शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांसोबत प्रशासनाची चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच काम केले जाईल असे यावेळी सांगण्यात आले.



जोपर्यंत शेतकऱ्यांचे समाधान होणार नाही तोपर्यंत शक्तीपीठ महामार्गाचे काम होणार नाही असेही पाटील म्हणाले. शक्तीपीठ महामार्ग धाराशिव जिल्ह्यातील १९ गावातून जाणार असून यामध्ये बाराशे पेक्षा अधिक शेतकरी बाधित होणार आहेत. धाराशिव जिल्ह्यात या महामार्गाला मोठा विरोध होत असून, प्रशासनाकडून आणि आमदार राणा पाटील यांच्याकडून शेतकऱ्यांशी संवाद साधून चर्चेतून हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

# विद्यार्थ्यांना ३२ पर्यंतचे पाढे, धडेही तोंडपाठ

## जिल्हाधिकारी पुजार यांनी घेतला विद्यार्थ्यांचा क्लास, प्रगतीबद्दल कौतुक

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हा परिषद शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांना ३२ पर्यंतचे पाढे आणि धडेही तोंडपाठ असल्याचे दिसून आल्यानंतर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांनी भरभरून कौतुक करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील अनसुर्डा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट देऊन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल आणि शाळा व्यवस्थापनाबद्दल समाधान व्यक्त केले.जल्हाधिकारी पुजार



यांच्यासोबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष हेही यावेळी उपस्थित होते. दोघांनीही शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली असता विद्यार्थ्यांनी सर्वच्या सर्व धडे पुस्तक न उघडता वाचून दाखवली तसेच ३२ पर्यंतचे पाढे म्हणून दाखवले. इंग्रजी कविता म्हणून दाखवल्या. त्यामुळे अधिकाऱ्यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्युनिअर परिक्षेत राज्यात आलेल्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी प्रदान केली. दोन्ही अधिकाऱ्यांनी अभय यादव, रंजना मोरे मॅडम तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षक दिपक नाडे यांचे विशेष कौतुक केले.

# भाग्यश्री हॉटेलच्या मालकाच्या अपहरणाचा प्रयत्न, मारहाण करून वडगावजवळ टाकले

आरंभ मराठी | धाराशिव

प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या हॉटेल भाग्यश्रीच्या मालकाच्या अपहरणाचा धक्कादायक प्रकार बुधवारी (दि.२३) सायंकाळी घडला.यादरम्यान मारहाण झाल्यामुळे हॉटेल मालकावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असून, या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे. हॉटेल भाग्यश्रीचे मालक नागेश मडके हे बुधवारी सायंकाळी सात ते सव्वा सात वाजण्याच्या सुमारास त्यांच्या हॉटेल भाग्यश्री समोर उभे होते. त्यावेळी तिथे एक चारचाकी गाडी आली आणि त्यांनी नागेश मडके यांच्यासोबत सेल्फी काढण्याची इच्छा व्यक्त केली. सेल्फी काढण्यासाठी ते जवळ गेले असता, त्यांना तसेच गाडीत ओढण्यात आले. गाडीमध्ये असणाऱ्या पाच जणांनी मडके यांना गाडीमध्ये जबर



मारहाण केली. हॉटेलकडून ही गाडी धाराशिवकडे नेण्यात आली. अपहरण करणाऱ्यांकडून मडके यांना जीवे मारण्याचा डाव रचला होता असा आरोप नागेश मडके यांनी केला. पाच जणांच्या या टोळीने मडके यांना जबर मारहाण करून वडगाव (सि.) येथील पुलावर फेकून दिले. मडके यांनी त्यांच्या कुटुंबियांना फोन करून सदर घटना सांगितल्यानंतर त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. याप्रकरणी अजून कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आला नसून, लवकरच गुन्हा दाखल करणार असल्याचे नागेश मडके यांनी सांगितले. मागील महिन्यात हॉटेल भाग्यश्रीवर हल्ला करून काही अज्ञातांनी तेथील पोस्टर फाडून टाकले होते. तसेच मागील आठवड्यात हॉटेलवर हाणामारी देखील झाली होती. सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झालेल्या या हॉटेलमध्ये जेवणासाठी मोठी गर्दी होत आहे.काही महिन्यापासून चर्चेत आलेल्या या हॉटेलमध्ये सध्या बाऊन्सर तैनात करण्यात आले असून, तरीदेखील अपहरणाचा प्रयत्न झाल्यामुळे या घटनेबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

# तुळजाभवानी मंदिराचा गाभारा नव्याने बांधण्यासाठी संस्थानच्या हालचाली

## नव्याने गाभारा बांधण्यास भोपे पुजारी मंडळाचा विरोध

आरंभ मराठी | तुळजापूर

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिराचा मुख्य गाभारा तसेच शिखराचे नव्याने निर्माण करण्याच्या हालचाली सुरू असून, याबाबत पुरातत्त्व खात्याकडून अहवाल प्राप्त झाला असल्याचे समजते. दरम्यान या संदर्भात तुळजापूर शहरातील पुजारी मंडळामध्ये मत-मतांतरे असून यामुळे या संदर्भात आता काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेले तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिरात मंदिर संस्थांनच्या निधीमधून ५८ कोटींची विकास कामे सुरू आहेत. ही कामे सुरू असताना मुख्य गाभाऱ्यातील टाइल्स काढल्यानंतर शिखराखालील शिळांना तडे गेल्याचे दिसून आले. त्यानंतर राज्य पुरातत्व विभागाकडून याची पाहणी करण्यात आली. राज्य पुरातत्त्व खात्याने याबाबत हा गाभारा व शिखर काढून त्या ठिकाणी नवीन बांधकाम करण्याचे सुचवले आहे. मात्र, या संदर्भात भोपे पुजारी मंडळाने आक्षेप नोंदवल्यानंतर केंद्रीय पुरातत्त्व विभागाने याची पाहणी केली. केंद्रीय पुरातत्त्व विभागाने आपल्या अहवालात म्हटले आहे की, सध्या आहे त्या स्थितीत गाभारा व शिखराची डागडुजी करून आहे त्या स्थितीत ठेवता येईल. मात्र याबाबत मंदिर संस्थान समाधानी नसून, यावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्याची मंदिर संस्थांनची मागणी आहे. या संदर्भात एक उच्चस्तरीय बैठक मुंबई येथे लवकरच होणार असून, यामध्ये याविषयीचा निर्णय होण्याची शक्यता आहे.



हिंदू धर्माचे अनन्यसाधारण वैशिष्ट्ये म्हणजे मूर्तिपूजा आणि मंदिर. मंदिरे म्हणजे केवळ इमारती नाहीत तर ती समाजाचा पाया, विश्वास, निष्ठा आणि भक्तीचे प्रतीक असून धर्माचे आणि देवत्वाचे मूर्त स्वरूप आहे. देवालय,म्हणजे देवाचे घर असून मानवाला कृतज्ञ करण्यासाठी देवाने, पृथ्वीवर निवास करण्यासाठी निवडलेले पवित्र स्थळ आहे. पुरातत्व विभागधर्मशास्त्र मोडीत काढून पुरातन कायद्याला हरताळ फासत आहे. जुने ऐतिहासिक व पौराणिक महत्व असलेले मंदिराचे जतन व संवर्धन न करता त्याची दुरुस्ती न करता ते पूर्णपणे पुर्णपणे घाट घातला जात आहे, याचा आम्ही जाहिर निषेध व्यक्त करतो.

**अमरराजे परमेश्वर**
अध्यक्ष, भोपे पुजारी मंडळ.

### पुरातत्व खात्याकडून अहवाल येईल त्याप्रमाणे कारवाई करा

याबाबत पुरातत्त्व खात्याकडून जो अहवाल येईल त्यानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच जर नवीन गाभारा बांधण्यात येणार असेल तर भाविकांना बाहेर पडण्यासाठी अजून एक मार्ग उपलब्ध करावा. चोपदार दरवाजा वाढवावा जेणेकरून भाविकांना सुलभ दर्शन घेता येईल. तसेच बाहेर पडणेही सोयीस्कर होणार आहे.

**विपिन शिंदे**
अध्यक्ष, पुजारी मंडळ.

### शेकडो वर्षांचा विचार करून निर्णय घ्यावा

याबाबत अजून एक अहवाल येणे बाकी असून, गाभारा व शिखरा संदर्भात तात्पुरती उपाययोजना करून चालणार नाही तर पुढील भविष्यात शेकडो वर्षांचा विचार करून याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. धोकादायक असलेले बांधकाम काढावेच लागणार असून, भविष्यात काही दुर्घटना घडू नये म्हणून काळजी घेणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल तसेच तज्ञांचे मत घेऊनच निर्णय घेण्यात यावा.

**अनंत कोंडो**
अध्यक्ष, उपाध्ये पुजारी मंडळ.

# पुढील चार दिवस मुसळधार पावसाचे.. खरीप पिकांना होणार फायदा

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यात पुढील चार दिवस दमदार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आलेली आहे. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या बळीराजाची चिंता काही प्रमाणात दूर होणार आहे. आजपासून शनिवारपर्यंत (दि.२६) धाराशिव जिल्ह्यात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे फुलोऱ्यात असलेल्या सोयाबीनला मदत होणार आहे. यावर्षी अनियमित पडलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवले. यावर्षी मे महिन्यात तब्बल २९८ मिमी पाऊस पडला. हंगामातील निम्मा पाऊस मे महिन्यात पडल्यामुळे पावसाळ्यात पाऊस पडेल की नाही अशी शंका व्यक्त करण्यात येत होती. आणि झालेही तसेच. मृग नक्षत्रात १० जूनपर्यंत जिल्ह्यात सर्वदूर दमदार पाऊस पडला. त्याच पावसावर शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरण्या केल्या. मात्र, त्यानंतर तब्बल दीड महिना पाऊस गायब झाला. तुषार सिंचनाच्या मदतीने शेतकऱ्यांनी सोयाबीन आणि इतर खरीप पिकांना जगवले. मात्र, फुलोऱ्यात आलेल्या सोयाबीनला पावसाची गरज असताना सोमवारी (दि.२१) जिल्ह्यात सर्वदूर दमदार पाऊस झाला. आता पुढच्या चार दिवसांत देखील पुन्हा दमदार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सध्या पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून, शनिवार पर्यंत जिल्ह्यात सर्वत्र हा पाऊस पडेल. सध्या खरीप पिकांना जीवदान मिळाले असले तरी जलसिंचन प्रकल्पात म्हणावा तसा पाणीसाठा झालेला नाही. सध्या जो पाणीसाठा साठला आहे, तो मे महिन्यातील पावसामुळे साठलेला आहे. जून आणि जुलै महिन्यात अजूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. उद्यापासून श्रावण महिना सुरू होत असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना श्रावणातील पावसाची प्रतीक्षा असणार आहे..

### धाराशिव शहर आणि परिसरात दमदार पाऊस

धाराशिव शहर आणि परिसरात बुधवारी दुपारनंतर दमदार पाऊस पडला. दुपारी चार वाजल्यापासून धाराशिव शहरात पावसाला सुरुवात झाली. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. ग्रामीण भागातही सायंकाळी पाच वाजता मुसळधार पाऊस पडला. सोमवारी पडलेल्या पावसानंतर या आठवड्यात दुसऱ्यांदा मोठा पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

### पुढील चार दिवसात पडेल मुसळधार पाऊस

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र हे पश्चिम दिशेने प्रवास करत जमिनीवर येईल. याचा मार्ग विशाखापट्टणम, हैदराबाद, तेलंगणा तसेच महाराष्ट्रात विदर्भ मार्गे मध्यप्रदेशकडे व पुढे गुजरात कडे असा आहे. हवामान प्रणालींच्या नियमानुसार कमी दाबाच्या दक्षिण आणि पश्चिम दिशेला पावसाची तीव्रता अधिक असते. पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाडा हा भाग या प्रणालीच्या पश्चिम व दक्षिण दिशेला येईल. त्यामुळे आजपासून पुढील तीन ते चार दिवस म्हणजेच २६ ते २७ जुलै पर्यंत विदर्भ मराठवाड्यात चांगला पाऊस असेल. २७ तारखेनंतर पावसामध्ये थोडीशी कमतरता येईल. पुढील तीन ते चार दिवसात बऱ्याच भागात नदी नाल्यांना पाणी येऊ शकते.

**सुरज जयपाल जाधव**
हवामान अभ्यासक.

CMYK

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संपादकीय

गुरूवार, दि. 24 जुलै 2025

# भेटी लागे जीवा ...

**अशी बोलते कविता**



राम आरडले.
९४२३८२७२३६

**महाराष्ट्र** ही संतांची भूमी आहे. मोठी संत परंपरा इथे लाभली आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, रामदास यांच्याविषयी तर सर्वजण परिचित आहेत. पण इतरही अनेक संत ज्यांच्या विषयी चर्चा जरा कमी होते. नविन पिढीला त्यांचीही ओळख होणे गरजेचे आहे. त्यांचे अभंग , तत्वज्ञान, विचार समाजापुढे आले पाहिजेत. संत सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेना महाराज, चोखामेळा, बंका हे आणि इतरही काही ... यासोबतच महाराष्ट्रात काही महिला संतांनीही आपला ठसा उमटवला आहे. ज्या काळी ज्ञानाचा अधिकार विशिष्ट उच्च वर्णीय समाजाला आणि त्यातल्याही फक्त पुरुषांनाच होता तिथे क्षुद्र समाजातील स्त्रियांनी अभंग रचना करावी, तत्वज्ञान मांडावे, समाजप्रबोधनाच्या गोष्टी कराव्या ही अपेक्षा कोण करेल? पण तशाही परिस्थितीत काही महिला संतांनी ते करून दाखवलं. संत मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांच्याच परंपरेत संत सोयराबाई आणि संत निर्मळा यांचाही समावेश होतो. आज आपण ज्यांची संतवाणी समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहोत त्या आहेत संत निर्मळा. संत परंपरेत एकाच कुटुंबातील निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताबाई ही चार भावंडे जशी संतपदाला पोहोचली तसे आणखी एक कुटुंब आहे जे फार कुणाला माहीत नसावे. (संत साहित्य अभ्यासकांना सोडून) असे मला वाटते. ते कुटुंब आहे संत चोखामेळा यांचे. स्वतः संत चोखामेळा , त्यांच्या पत्नी संत सोयराबाई, चोखामेळा यांची बहीण संत निर्मळा आणि त्यांचे पती संत बंका महाराज (हेच सोयराबाई यांचे बंधुही होते) यासोबतच चोखामेळा यांचे पुत्र कर्ममेळा हेदेखील संत कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. असे एकच कुटुंबातील चार पाच व्यक्ती आपल्या विठ्ठलाच्या भक्तीने , आपल्या प्रतिभेने , झालेल्या जाणिवेने थेट संत पदापर्यंत जाऊन पोहोचतात ही फार मोठी गोष्ट आहे. त्यात आणखी




विशेष हे की हे कुटुंब त्याकाळी प्रचलित जातीव्यवस्था अनुसार अतिक्षुद्र अशा महार जातीचे होते. कर्मठ , सनातनी लोकांनी जिथे कुणबी असणाऱ्या तुकारामांचा इतका छळ केला तिथे त्यांच्याही आधी म्हणजे तेराव्या शतकात यांना काय काय सहन करावे लागले असेल याची कल्पनाही करता येणार नाही. अभंगाचे चिंतन करूया. आपले बंधू चोखामेळा यांनाच गुरुस्थानी मानणाऱ्या संत निर्मळा प्रस्तुत अभंगांत असे म्हणतात रात्रंदिवस मन करी तळमळ । बहु हळ हळ वाटे जीवा संत निर्मळा म्हणतात रात्रंदिवस माझे मन सतत तळमळत आहे माझ्या जीवाला खूपच हळहळ वाटते. मला खूप चिंता लागली आहे. इथे जी चिंता त्यांना लागली आहे ती त्यांच्या कुठल्याही वैयक्तिक , सांसारिक गोष्टींची नसून विठ्ठलाच्या भेटीची आहे. मी रात्रंदिवस एवढे नामस्मरण करून , भक्ती करूनही तू मला भेटत नाहीस याची चिंता आहे. काय करूं आतां पाउलें न दिसती । पडिलीसे गुंती न सुटे गळे माझ्या संसाराच्या आणि जबाबदारीच्या गुंत्यात मी पुरती अडकले आहे. मला यात कसलाही रस नाही पण माझ्याकडे काही उपाय नाही. माझी पावले आता मला दिसत नाहीत, त्यांना तुझ्यापर्यंत पोहोचता येते नाही. कारण संसाराच्या या जंजाळात मी गळ्यापर्यंत बुडाली आहे. बहु हा उबग आला संसाराचा ।तोडा फांसा याचा मायबापा या प्रपंचाचा मला खूप उबग आला आहे. हे देवा मला बसलेला हा संसाराचा पाश तोडून टाक. या बंधनातून मला मुक्त करा. मला याचा वीट आला आहे. मायबापा मला तुमच्या चरणाशी जागा द्या. निर्मळा म्हणे आतां दुजेपण । चोखियाची आण तुम्हां असे संत निर्मळा म्हणतात हे देवा आता मला संसारापासून परकेपणा येऊ दे. इथून मला मुक्त कर. मला तुझ्याजवळ येऊ दे. एकरूप होऊ दे. आता हे दुजेपण नको. माझा भाव तुझ्या ठायी आहे. या भौतिक बंधनात मला आता अडकवून ठेऊ नकोस. आणि विषेश म्हणजे यासाठी त्या देवाला आण घालतात. त्या म्हणतात चोखामेळाची शपथ मी तुम्हाला घालते आहे. मला इथून सोडवा. यावरून चोखोबा यांचा अधिकार किती मोठा असावा याचीही कल्पना येते. संत असेच असतात. देवावर त्यांचा हक्क आहे. देवही त्याच्या मागण्या मान्य करतो. पण त्यासाठी तितकीच ओढ, जिव्हाळा, प्रेम त्याच्याविषयी असावे लागते. या संत परिवाराने भक्ती संप्रदायासाठी दिलेले योगदान , त्यांच्या रचना, तत्वज्ञान , सामाजिक अन्यायकारक रूढीवर त्यांनी घातलेले घाव या सर्वांची दखल आपण पुन्हा पुन्हा घेतली पाहिजे. नवीन पिढीला ते आवर्जून सांगितले पाहिजे. पांडुरंगाने आपल्या भक्तांमध्ये कधीही भेदभाव केला नाही. सर्वांना जवळ केले. म्हणूनच माझा विठू लेकुरवाळा आहे. असो.

# जगदाळे महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती




आरंभ मराठी | वाशी

वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय येथे बुधवारी (दि.२३) थोर स्वातंत्र्य सेनानी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे अग्रणी नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १६९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.शाम सुंदर डोके व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ आनंद करडे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी प्रभारी प्राचार्य प्रा.शाम सुंदर डोके म्हणाले की, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोठे योगदान आहे. टिळकांचे व्यक्तिमत्व करारी असल्यामुळे त्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील असंतोषाचे जनक म्हणत असत. टिळकांनी सार्वजनिक गणेशउत्सव सुरु करून जनजागरण केले व अगोदर स्वातंत्र्य आणि नंतर सामाजिक सुधारणा असे ते म्हणत असत. एक निर्भीड पत्रकार, शेतकऱ्याचे कैवारी तसेच उत्तम प्राध्यापक असे टिळकांचे व्यक्तिमत्व होते असे डोके यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा.डॉ.आनंद करडे यांनी केले तर प्रा.एम.डी उंदरे यांनी आभार मानले. सदरील कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# दीपकांचा संदेश..!


**शुमंकरोति** कल्याणमं आरोग्यम धनसंपदा:
शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योती नमोस्तुते
दीपज्योती परब्रम्ह: दीपज्योती जनार्दना
दिपो हरतू पापं दीपज्योती नमोस्तुते'

हे दीपज्योती, तू आमचे शुभ करणारी, कल्याण करणारी, आरोग्य धनसंपदा देणारी, शत्रु बुद्धीचा नाश करणारी आहे. तुला नमस्कार. हे दीपज्योती तू परब्रम्ह आहेस, जनार्दन आहेस पापाचा नाश करते. तुला आमचा नमस्कार असो. उपरोक्त श्लोकाचा हा भावार्थ. जेव्हा पहाटेच्या मंगल सूर्यकिरणांनी वसुंधरेची कांती उजळते. तसेच कातरवेळी सूर्य मावळतीला जातो आणि दर दिवसाचा उदय आणि अस्त होतो. अशा दोन्ही प्रहरी देवाच्या देव्हाऱ्याजवळ तेलाचा अथवा तुपाचा दिवा लावून वंदन केले जाते. दिव्या दिव्या दीपत्कार देवाला पाहून नमस्कार' अशी हात जोडून भक्तीभावे प्रार्थना केली जाते. हिंदू संस्कृतीत दीप प्रज्वलनाला आणि वंदनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुठल्याही मंगल कार्याची सुरुवात दीप प्रज्वलनाने होत असते. आपल्या महान अशा संस्कृतीत जगाच्या पाठीवर केवळ हिंदू संस्कृतीत दीपोत्सव साजरा करण्याचा प्रघात आढळून येतो. दिव्यांचा सण दिवाळी तर नरक चतुर्दशीला दीपदान करण्याची पद्धत आहे. तर आषाढ अमावस्येला दीप पूजन करण्याची परंपरा पुराण काळापासून चालत आलेली आहे. आज गुरुपुष्यामृत योग व आषाढ अमावस्या या दुहेरी मंगल पर्वावर दीप पूजनाचा दिवस आहे. या दिवशी परंपरेप्रमाणे घरातील तांबा- पितळीचे दिवे, समई, निरांजनी, दिवे घासून पुसून स्वच्छ करून तेल अथवा तुपाचा दिवा प्रज्वलित करून विशेष अशी दिव्याची पूजा केल्या जाते. त्यालाच दीपपूजा असेही म्हणतात. प्रत्येक मानवप्राणी हा काम, क्रोध, लोभ,मोह,माया, मस्सर, ईर्षा या षड्विकाराने ग्रस्त आहे. परंतु जेव्हा मानवाचे जीवन प्रकाशाने उजळून जाते, तेव्हा त्याच्या जीवनातील षडविकार नष्ट होतात. दिव्याच्या मंगल सात्विक प्रकाशाने सर्व आसमंत उजळून जातो. दीपप्रकाश हा ऊर्जादायी व प्रेरणा स्तोत्र असतो. तेलाचा अथवा तुपाचा दिवा प्रज्वलित करण्यामागे एक मोठी धार्मिक परंपरा असली तरी त्याचे महत्त्व आजच्या विज्ञान युगात समजून घेणे तेवढेच महत्त्वाचे ठरते. ज्या ज्या वेळी दीप प्रज्वलन होते, त्यावेळेस तो परिसर एका सकारात्मक ऊर्जेने वलयांकित होतो. दिव्यांच्या मंद मंद जळणाऱ्या ज्योतीने आत्मज्योतिची कल्पना येत असते आणि मन अंतर्मुख होऊन जातो. एका दिव्याच्या ज्योतीने सहस्त्रद्वीप प्रज्वलित करता येतील.मात्र विद्युतीकरणाच्या दिव्यात ही अनुभूती येते का? म्हणून या काळात दीपज्योतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. मानवाने या जळणाऱ्या दीपांपासून प्रेरणा घेतली पाहिजे. म्हणजे काय तर मानवाने आपल्या सद्विवेक बुद्धी व सद्विचारांचा प्रकाश समाजातील अंधकारावर करण्यासाठी व्रतस्थ राहिले पाहिजे. मंदिराच्या गाभाऱ्यात सतत



तेवत असणारा नंदादीप हा परमेश्वराचे सूक्ष्मदर्शन घडवीत असतो. सूर्यास्थानंतर अंधाराचे साम्राज्य पसरते. अशावेळी एखादी पणती प्रकाशाचे दान देण्यास समर्थपणे उभी असते. एवढ्या काळोखात सुद्धा ते इतरांना स्थितप्रत ठेवण्यास ठेवण्याचे बळ प्रदान करते. ती स्वतः जळून इतरांचे जीवन प्रकाशमान करते. मानवी जीवनाचा प्रवास असंच असतकडून सतकडे.. अंधारातून प्रकाशाकडे.. तसेच मृत्यूकडून अमरत्वाकडे होणे जरुरी आहे. अखिल विश्वाला शांतीचा मार्ग दाखवणारे तथागत गौतम बुद्ध म्हणतात- 'अत:दीप भव:' मानवी जीवनाच्या सकल उत्थानासाठी कार्य करणारे ऋषी महर्षी विश्वात ज्ञानाचा प्रकाश सतत पसरत राहावा यासाठी सतत स्वाध्यायदीप तेवत ठेवायला सांगतात. आज स्वतः जळून जगाला प्रकाशमान करणाऱ्या दीपकांची समाजाला नितांत गरज आहे. अज्ञानरूपी अंधकार व अंधविश्वासरूपी घट्ट काळोखाला दूर सावरण्यासाठी आज खऱ्या दीपकांची गरज आहे.

' दुरितांचे तिमिर जावो, विश्वधर्म सूर्य पाहो,
जो जो वांछील, ते ते लाहो प्राणी जात'



**शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# विद्यार्थी,शिक्षक आणि पालक यांच्यात समन्वय हवा

**४ दिवसांपूर्वी** मोबाईल दुरुस्तीच्या कामासाठी एका दुकानात गेलो. काही वेळात २ अल्पवयीन मुले मोटारसायकलवरून आले. डोक्याची विचित्र केशरचना. ढगळ टी शर्ट, उंदराने कुरडल्यासारखी जीन पँट. (हल्लीची नवीन फॅशन) त्यांनी दुकानदाराकडे मोबाईलचे कव्हर मागितले. दुकानदाराकडे ते शिल्लक नव्हते. त्याने विचारले, 'केवढ्याला घेतला मोबाईल'? त्याने 'टपोरी' भाषेत सांगितले '१८ हजारको लिया ना भाई', असे म्हणत ते निघून गेले. मी दुकानदाराला विचारले कितवीत आहेत ही मुले? तो म्हणाला आठवीत. आठवीतल्या मुलाला ज्याचा बाप १८ हजारांचा मोबाईल आणि महागडी मोटारसायकल देतो. तो दिवटा पुढे काय दिवे लावेल? हे सांगण्याची गरज आहे का ? हा किस्सा सांगण्याची गरज म्हणजे, काल वर्तमानपत्र वाचताना '२ अल्पवयीनांकडून मुलाचा खून' ही बातमी वाचून अक्षरशः अंगावर शहारे आले. भोकरदन येथील गणपती निवासी आश्रम शाळेत इयत्ता दुसरीत शिकणा-या बालवीर अजय पवार या ८ वर्षीय चिमुरड्याचा, त्याच्याच ८ वर्षीय आणि १४ वर्षीय मित्रांनी दोरीने गळा आवळून खून केला. चिंताजनक बाब म्हणजे, खेळता खेळता एकमेकांना चिडवण्यावरून त्यांचे किरकोळ भांडण झाले. पण, या किरकोळ भांडणाचा शेवट मात्र मनाला चटका लावणारा ठरला. या घटनेने अल्पवयीन मुलांच्या गुन्हेगारीचा अतिशय गंभीर प्रश्न मात्र पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तशी ही काही पहिलीच घटना नाही. काही महिन्यांपूर्वी चक्क शिक्षण मंत्र्यांच्या नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील घोटी या गावात, एका शाळेतील मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या दप्तरांची झडती घेतली. आश्चर्य आणि चिंताजनक बाब म्हणजे, वह्या- पुस्तकांऐवजी त्यात चक्क फायटर, चाकू, अमली पदार्थ आणि निरोधची पाकिटे मिळून आली. अर्थात, याआधीही नाशकातच काही अल्पवयीन मुलांच्या दप्तरात कोयते आणि फायटर सापडले होते. तर, एका नामांकित इंग्रजी शाळेत नववीच्या एका विद्यार्थ्याने आपल्याच वर्गमित्राचा दुपारच्या सुटीत खून केला होता. त्याआधी नालासोपारा येथे एका अल्पवयीन मुलाने 'शेंबडा' म्हटले म्हणून, ८ वर्षे वयाच्या मुलीचा गळा दाबून खून केला होता. संतापजनक बाब म्हणजे, त्याच्या वडिलांना ही बाब समजताच, त्यांनी त्या मुलीचा मृतदेह गुपचूप पुरून मुलाच्या दुष्कृत्यावर पांघरून घातले होते. अशा घटना घडण्यामागे आपल्या आजूबाजूचे वातावरण हे अशा बालमनांवर अतिशय गंभीर परिणाम करत आहे. दूरदर्शन आणि भ्रमणध्वनीवरील भयानक हिंसाचार आणि द्वेषाची होणारी उधळण बघून, मुलांच्या मनात त्याचे अनुकरण करण्याची भावना अनावर होऊन, त्यांच्या हातून कळत नकळत असे गंभीर गुन्हे घडतात, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. घोटी येथे ज्या मुलांकडे हत्यारे सापडली, त्यांची केशरचनाही विचित्र पध्दतीची होती. मुख्याध्यापक व शिक्षकांनी नाभिकास बोलावून त्यांचे केस व्यवस्थित कापले. शिस्त लावण्याचा हा 'गांधीगिरी' उपाय खरेच कौतुकास्पद आहे. पण, काही शाळांत शिक्षक शिस्तीच्या नावाखाली



विद्यार्थ्यांना मारहाण करतात. काही महिन्यांपूर्वी गोव्यात शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षा म्हणून शिक्षकांकडून मोठ्या प्रमाणात मारहाण झाल्याच्या सलग २ घटना घडल्या. अपेक्षेप्रमाणे पालकवर्गात खळबळ उडाली होती. गोवा असो किंवा दुसरे कोणतेही राज्य असो. अशा प्रकारच्या घटना अधुनमधून घडण्याच्या बातम्या आपल्या कानावर येतच असतात. परंतु, चिंताजनक बाब म्हणजे, असे अमानवीय दुष्कृत्य आता भरमसाठ फी घेणा-या खासगी शिकवणी वर्गातही मोठ्या प्रमाणात घडू लागले आहेत. त्यामुळे यावर जनजागृती होण्यासाठी गावांतील, शहरांतील शाळांमध्ये विद्यार्थी-शिक्षक आणि पालक यांच्यात 'समन्वय' साधण्यासाठी 'कार्यशाळा' 'चर्चासत्र' किंवा तत्सम उपक्रम राबवणे, ही काळाची गरज बनली आहे, असे वाटते.सातत्याने घडणा-या या दुर्दैवी घटनांना फक्त शिक्षकांनाच जबाबदार धरता येणार नाही. विद्यार्थी, पालक, शिक्षणसंस्था आणि राजकारणही तितके, किंबहुना जास्त जबाबदार असल्याचे मला वाटते. ज्या क्षेत्रात राजकारण शिरते त्याचा बट्ट्याबोळ झाला, असेच समजावे. आज हयात असणा-या सुमारे ९०% शिक्षण संस्था या राजकीय नेत्यांनी घशात घातल्या आहेत. त्यामुळे तेथेही राजकारण घुसले. बहुतेक शाळांमध्ये काही पक्षांच्या संघटना आहेत. दुर्दैवाने अनेक शिक्षकही यांचे कार्यकर्ते आहेत. कोणतीही निवडणूक लागली की, या कार्यकर्ता कम शिक्षकाला ज्ञानार्जनाचे हक्काचे काम सोडून प्रचार अन्यथा तत्सम कार्याला जुंपले जाते. त्याचप्रमाणे काही शिक्षक एकाच ठिकाणी कायमचे बस्तान बसविण्यासाठी गाव किंवा शहरातील आपल्या मर्जीतील काही नागरिकांना एकत्र करून 'पालक-शिक्षक' संघ किंवा संघटना स्थापन करून, त्याद्वारे दबाव टाकून आपले ईप्सित साध्य करतात. जरी ही संकल्पना चांगली असली तरी, संघटना म्हटली म्हणजे, आपसुकच राजकारण येते. त्यामुळे मूळ आदर्श हेतूंना हरताळ फासला जातो. खरे तर अशा वादग्रस्त संघटनांची शिक्षणक्षेत्रात गरजच काय? पहिल्या कोठे होत्या संघटना आणि संघ? तरीही व्यवस्थित काम चालूच होते ना? नव्हे, अशा घटनाच घडत नसे.पालकांनीही आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. मुलाला शाळेत टाकले म्हणून आपले कर्तव्य संपले. आता शिक्षक बघून घेतील, अशा भ्रमात राहू नये. घरी आल्यानंतर तो गृहपाठ करतो की नाही? त्याला काही मदत हवी आहे का? याची चौकशी करायला हवी. वरचेवर शिक्षकांना भेटून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घ्यायला हवा. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे, आपल्या पाल्याचे मित्र कोण आहेत? शाळेव्यतिरिक्त तो काय करतो? सोशल मीडियाच्या आहारी तर गेला नाही ना? याची माहिती घेणे फार आवश्यक आहे. सोशल मीडियामुळे मुले खुप बिघडली आहेत. छोट्याश्या कारणांमुळे ते घर सोडून जात आहेत. काही आत्महत्येसारखे पाऊलही उचलतात. शिक्षक रागावले तर, 'तू बाहेर भेट, तुला दाखवतोच' अशा धमक्या दिल्या जात आहेत. खरेतर ही अत्यंत चुकीची बाब आहे. म्हणून पालकांनी 'डोळ्यात तेल घालून' आपल्या पाल्यावर लक्ष ठेवणे, ही काळाची गरज झाली आहे.आई-बाबा होणे, हा प्रत्येक दाम्पत्याच्या आयुष्यातील सुखद असा 'सुवर्णक्षण' असतो. मान्य आहे. परंतु त्याचे लाड, मागण्या पूर्ण करण्याबाबत तेव्हापासूनच योग्य खबरदारी घेणे आवश्यक आहे.काही दाम्पत्य आपल्या मुलाची प्रत्येक गोष्टीत दुस-यांच्या मुलांशी तुलना करतात; आणि त्याला दोष देत असतात. त्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्येक मुलाची बुद्धी, आकलन शक्ती आदी बाबी एकसारख्या नसतात. निसर्ग प्रत्येकाची जडणघडण वेगवेगळी करत असतो. दोघांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक असतो. दुस-या मुलामधील एखादा गुण तुमच्या मुलामध्ये नसेल. परंतु, त्याऐवजी दुसरा एखादा चांगला गुण मोठ्या प्रमाणात असू शकतो. त्यामुळे शक्यतो आपल्या मुलाची इतरांशी तुलना करणे टाळावे. अन्यथा, मुलामध्ये तुमच्याविषयी राग, संताप, खुन्नस, घृणा निर्माण होऊ शकते. हल्ली समाजात मुलाला फक्त जन्म देणे, एवढीच जबाबदारी असल्याची मानसिकता ठेवणारे पालकही दुर्दैवाने दृष्टीस पडतात. पालकत्व आल्यानंतर त्याबरोबर आपल्या जबाबदा-याही वाढतात, याचे भान राखणे, अशा पालकांनी फार आवश्यक आहे. मुलांचे पालनपोषण करताना योग्य ती काळजी, सावधगिरी घेणे, थोडक्यात सतर्क राहणे, हे तुमचे आद्यकर्तव्य असायला हवे. कारण, तुम्ही त्याच्यावर जसे संस्कार कराल, जे काही शिकवाल तेच ते आत्मसात करेल. त्याची जशी जडणघडण कराल, तसाच परिणाम त्याच्या मानसिकतेवर, शरीरावर, स्वभावावर होईल, याची काळजी आणि खबरदारी घेणे फार आवश्यक आहे. त्याचप्रमाणे लहान असतानाच त्याला हळूहळू त्याच्या कलानुसार हसतखेळत शिस्तीचे 'बाळकडू'ही द्यायला सुरुवात करा. अन्यथा, तो अतिलाडामुळे हट्टी झाल्यास त्याला शिस्त लावण्यास कठीण जाऊ शकते. प्रसंगी तुम्हाला कठोरही व्हावे लागू शकते. कारण हट्टापायी त्याच्या स्वभावात 'बंडखोर'पणा रुजला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या उपायांचा उपयोग केल्यास; आणि 'शिक्षक-पालक-विद्यार्थी' यांचे एकत्रितपणे समुपदेशन करण्यासाठी, काही सामाजिक संस्था, एनजीओ यांना हाताशी धरून गावोगावांच्या शाळांत 'कार्यशाळा' आणि 'चर्चासत्रे' आयोजित केल्यास, अशा घटनांना पायबंद बसेल, अशी आशा वाटते.

**प्रदीप व्ही. खोलमकर**
मो. ८७६७५९२९८०

# जीना है तो हसके जियो...

**आमच्या** दुकानात आनंद मिळेल' अशी पाटी सध्या तरी कोठे वाचायला मिळत नाही. बाकीच्या जीवन उपयोगी सगळ्या गोष्टी दुकानात विकत मिळतात. परंतु, मानवी मनाला सुखद आनंद देणाऱ्या गोष्टी अजुन तरी कुठल्या दुकानात विक्रीसाठी उपलब्ध नाहीत. आनंद, हास्य, सुख, समाधान आणि माणुसकी या गोष्टी दुकानात विक्रीसाठी उपलब्ध होणे अशक्य आहे. आनंद, हास्य, सुख, समाधान व माणुसकी या गोष्टी वेगवेगळ्या क्लबमध्ये सहभागी झाल्यावर त्या कदाचित मिळू शकतात. त्यासाठी नातलगांसोबतची व मित्रांसोबतची मैत्री निकोप आणि चिरकाळ टिकणारी असावी. मित्रांसोबत मनसोक्त गप्पा मारल्या आणि मन मोकळं केलं की मन प्रसन्न होते. एकमेकांना हलके फुलके विनोद सांगून खळखळून हसता आले पाहिजे. नाहीतर चांगले विनोद ऐकले तरीही काहीजण मठ्ठच राहतात. त्यांच्या कपाळावरच्या वक्र रेषा कधीच निघत नाहीत. रोजच्या दैनंदिन जीवनात नोकरी निमित्त प्रवास करताना एके दिवशी कारमध्ये एक हिंदी गाणे ऐकून मन प्रसन्न झाले. 'जीना है तो हसके जियो, जीवन में एक पल भी रोना ना' असे काही तरी त्या गाण्याचे बोल होते. हे गाणे लक्षपूर्वक ऐकताना जीवन गंभीर होऊन जगायचे नसते हे लक्षात आले. जीवनाचा काहीच भरवसा नाही, क्षणात जीवनाचा अंत व्हायला वेळ लागत नाही हे ही लक्षात आले. आणि म्हणून जीवन हे नेहमी हसून खेळून जगता आले पाहिजे. ज्यांना जीवन हसतखेळत जगात येते ते लोक कोणत्याही विपरीत परिस्थितीतही आनंदी मनाने जीवन जगत असतात. कोणी दुःखी कष्टी व निराश दिसला की त्याला हसवता येणे ही एक सुंदर कला आहे. माझे शिक्षक मित्र दत्तात्रय मोहिते हे आमच्या सोबत दररोज प्रवास करताना आम्हाला खूप खूप हसवतात, आनंदी जीवन जगण्याचा सल्ला देतात. कधीतरी स्वतःसाठी जीवन जगायचे असते हे पुन्हा पुन्हा समजावून सांगतात. ते सोबत असले की प्रवास कधी संपला कळत सुद्धा नाही.

शहरातील काही चौकात मरण पावलेल्या लोकांचे भावपूर्ण श्रद्धांजलीचे मोठे फोटो लावलेले दिसतात. ते वारंवार पाहून मनाला वाटते, की एके दिवशी आपलाही असा फोटो लागणार आहे. तसा फोटो पाहणारे म्हणतील, अखेर हा ही गेला का?' आजकाल लोक कशानेही पटापट मरत आहेत. त्यात आपलाही अचानक नंबर लागू शकतो. आपण अमरत्व लाभल्यासारखे निश्चिंत जीवन जगू शकत नाही. हे नेहमी लक्षात घेतले पाहिजे. 'जीवन म्हणजे क्रिकेट राजा,हुकला तो संपला' हे गाणे व माझ्या आवडीचे इतर काही गाणे मी दररोज ऐकतो. जिंदगी की यही रीत है हार के बाद जीत है किंवा जिंदगी प्यार का गीत है उसे हर दिल को गाना पडेगा,अशी काही गाणी ऐकली की एक विलक्षण आनंद मिळतो.शाळेत अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहिला की मन प्रसन्न होते. माझे सहकारी शिक्षक मित्र विलास आगलावे,बालाजी नाईक व अंकुश आडे हे नेहमी आम्हाला हसवतात. जीवनात चांगले कर्म करत राहिले की आनंद सहजतेने मिळतो याची प्रचिती अनेक वेळा आली आहे. एकनाथ पलमटे हे पेशाने शिक्षक आहेत पण ते वेगवेगळ्या भूमिका पार पाडतात.फावल्या वेळात ते समाजकार्यात गुंतून राहतात.जमेल तेवढी नातेवाईकांना आर्थिक मदत करतात.त्यांनी बऱ्याच वेळा पदरमोड करून अनाथ मुलांचे वाढदिवस साजरे केले आहेत. दिवाळी सणाला ते अनाथ मुलांना कपडे घेतात.त्यांच्याबरोबर मी पण दोन अनाथ मुलांना नवीन कपडे विकत घेऊन देतो.ते नवीन कपडे नेसल्यानंतर अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर जो आनंद पसरतो तो इतरत्र कुठेही आढळणार नाही!

स्वतःसाठी तर सगळेच जगतात, कधी दुसऱ्यांसाठी
जगून पाहा. गरजवंतांना सढळ हाताने मदत
करा.आणि गुणगुणत राहा,जीना है तो हसके



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

जियोजीवन में एक पल भी रोना ना...

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
गुरुवार, दि. 24 जुलै 2025

# शेतकरी मेळाव्याला प्रतिसाद; १०० हून अधिक शेतकऱ्यांचे काढले फार्मर आयडी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाचा उपक्रम







**आरंभ मराठी | मुरुम**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुरुम शहरात भारतीय जनता पक्ष व उमरगा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (ता. २३ जुलै) रोजी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आणि १०० हून अधिक शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करण्यात आले. यावेळी अनेक शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी योजना या योजनांचा लाभ मिळत नव्हता, त्यांच्या समस्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा नेते श्रीकांत मिणियार होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उमरगा येथील तालुका कृषी अधिकारी डी बी रितापुरे, मुरुम मंडळाचे कृषी अधिकारी लक्ष्मीकांत फडणीस, यांच्यासह कृषी विभागातील एस टी शिंदे, बळीराम जाधव, एच एस बिराजदार, व्ही व्ही साखरे या विविध अधिकाऱ्यांसह गुलाब डोंगरे, दत्तू गिरीबा आदी मान्यवर प्रमुख उपस्थितीत होते. उपस्थितांना संबोधित करताना कृषी अधिकारी रितापुरे व फडणीस यांनी कमी खर्चात अधिक उत्पादन मिळवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकांत मिणीयार यांनी आपल्या मनोगतातून मागील ११ वर्षांत देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शेतकरी हितासाठी सुरू केलेल्या योजनांचे स्मरण करून दिले तसेच यापुढे देखील भाजप शेतकऱ्यांच्या सेवेसाठी कटिबद्ध राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.याशिवाय कार्यक्रमात धनराज वाडीकर, शोभा बेगमपुरे, मनीष ब्याळे, सिद्धलिंग हिरेमठ, आकाश क्षीरसागर, अरविंद फुगटे, बाबुराव बेगमपुरे, सुरेश गायकवाड, ब्रम्हानंद कांबळे, दत्ता शिरसाठ, रायपा कांबळे, शिवाजी दूधभाते, विजयसिंह चौहान यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशाल व्हनाळे, सुनिल निलवाडे, लक्ष्मण शेळके, रविराज सराटे, प्रभुराज कोळी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन महेश धुमुरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गुलाब डोंगरे यांनी मानले.

# नूतन विद्यामंदिरात लोकमान्य टिळक जयंती साजरी



**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव शहरातील नूतन प्राथमिक विद्यामंदिर येथे थोर राष्ट्रपुरुष लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमात प्रशालेचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे यांनी टिळकांच्या जीवनावर भाषण करताना त्यांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्य उलगडून दाखवले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे आणि निबंध सादर करून कार्यक्रमात रंग भरले. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' या टिळकांच्या बोधवाक्याने उपस्थितांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# परदेश अभ्यास दौऱ्यासाठी जिल्ह्यातील ५ शेतकऱ्यांची होणार निवड

## ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**आरंभ मराठी | धाराशिव**

शेतकऱ्यांच्या ज्ञानात वाढ करणे, त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळवून देणे आणि शेतीतील उत्पादनात वाढ साधणे या उद्देशाने राज्य शासनाकडून सन २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांचे परदेश अभ्यासदौरे आयोजित करण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत जिल्ह्याला ५ शेतकऱ्यांचा लक्षांक प्राप्त झाला आहे. या अभ्यासदौऱ्यासाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांना नेदरलँड, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स, इस्त्राईल, जपान, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स, चीन आणि दक्षिण कोरिया या देशांमध्ये पाठवण्यात येणार आहे. तेथील शेती, सेंद्रिय उत्पादन, जल व्यवस्थापन, दुग्धोत्पादन, काढणीपश्चात तंत्रज्ञान व कृषी यांत्रिकीकरण अशा विविध बाबींचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. जिल्ह्यातून एक महिला शेतकरी, एक कृषि पुरस्कारप्राप्त अथवा पीक स्पर्धा विजेता शेतकरी आणि तीन इतर शेतकऱ्यांची निवड केली जाणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी काही महत्त्वाच्या अटींची पूर्तता करणं आवश्यक आहे. अर्जदाराचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे, वैध पासपोर्ट असावा, शेती हे उत्पन्नाचे मुख्य साधन असावे, ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी असणे आवश्यक आहे. याशिवाय शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि कोरोनासंदर्भातील अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. शेतकरी हा सरकारी, निमसरकारी, खाजगी नोकरीत अथवा डॉक्टर, वकील, सीए, अभियंता नसावा. तसेच त्याने पूर्वी शासकीय मदतीतून परदेश दौरा केला नसावा. अर्जासोबत ७/१२, ८अ उतारा, आधार, शिधापत्रिकेची झेरॉक्स आणि स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# तहसील कार्यालयाच्या पायऱ्यावर मांडला पत्त्यांचा डाव

## कृषीमंत्री कोकाटे यांची मंत्री पदावरुन हकालपट्टी करण्याची मागणी

**आरंभ मराठी | कळंब**




शेतकऱ्यांच्या भावना समजून घेण्यासाठी अपयशी ठरलेल्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची कृषीमंत्री पदावरून तत्काळ हकालपट्टी करण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी तहसीलच्या पायऱ्यावर बसून प्रतिकात्मक आंदोलन म्हणून पत्त्यांचा डाव मांडून धरणे आंदोलन केले.

मुळे यांनी म्हटले आहे की,कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कृषीमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यापासून शेतकऱ्याविषयी अनेकवेळा वादग्रस्त विधान केली आहेत. कृषी विभाग म्हणजे ओसाड गावची पाटीलकी, ढेकळांचे पंचनामे करायचे का, शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी करून भिकारीही एक रुपया घेत नाही असे विधान केले. अशा प्रकारची अनेक शेतकरी विरोधी वक्तव्य केली आहेत, ज्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समज देऊनही कोकाटे यांच्यात फरक पडला नाही. राज्यातील शेतकरी संकटात असताना कोकाटे यांचे वागणे चुकीचे होते, त्यांचे वर्तन कृषीमंत्री या पदाला शोभणारे नाही. कृषीमंत्री हे पद संवैधानिक पद आहे. ज्यामुळे महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेणे हे कृषिमंत्र्याचे काम असते. कृषीमंत्री कोकाटे यांना अध्यापही कृषीमंत्री पदाची कर्तव्य व जबाबदारी समजण्यात अपयश आले आहे. कृषीमंत्र्यांना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रश्न समजत नाही. परंतु ऑनलाइन जंगली रमी खेळण्याचा खेळ मात्र जमतो अशा निष्क्रिय कृषीमंत्र्यांना मंत्रिपदावर राहण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही. या आंदोलनाला विठ्ठल यादव, वासुदेव पांचगे, दिपक वाघमोडे, आशिष चौधरी, आर्यन लोहार यांनीपाठिंबादिला.

# समता मा. विद्यालयात लोकमान्य टिळक यांना अभिवादन



**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव शहरातील शिक्षक कॉलनी मधील समता मा. व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि.२३) लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. समता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. एम. एडके यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# सुनीता पावशेरे राज्यस्तरीय ग्राम समृद्धी पुरस्काराने सन्मानित

**आरंभ मराठी | उमरगा**

उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा गावाच्या माजी सरपंच, विद्यमान उपसरपंच आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा महिला उपाध्यक्षा सुनीता देविदास पावशेरे यांना ग्रामविकास क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय ग्राम समृद्धी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा गौरव पुणे येथील नालंदा ऑर्गनायजेशनच्या वतीने एस.एम. जोशी सभागृह, नवी पेठ येथे (दि. १९ जुलै) आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे सहसंचालक श्रीपाद खळीकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व मेडल देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितींमध्ये आय.पी.एस. अधिकारी अभिजित चौधरी, सामाजिक कार्यकर्ते अभिजित आहेर, ए.आर.जी. ग्रुपचे चेअरमन जितेंद्र दाते आणि प्रसिद्ध अभिनेते-दिग्दर्शक विनोद वणवे आदींचा समावेश होता. सुनीता पावशेरे यांनी अल्पावधीत आपल्या गावात जलव्यवस्थापन, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, रस्ते विकास, सामाजिक सलोखा आणि शासन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसह अनेक उपक्रम राबवत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वगुणांचे व कार्यक्षमतेचे नालंदा संस्थेने



घेतलेल्या सर्वेक्षणातून विशेष मूल्यांकन करण्यात आले असून, त्यातूनच या सन्मानासाठी त्यांची निवड करण्यात आली. या उल्लेखनीय पुरस्काराबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष व भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुरेश बिराजदार, ग्रामपंचायत सरपंच महादेव कांबळे, ग्रामस्थ, महिलावर्ग, आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. या प्रसंगी जयश्री पावशेरे, अमित पावशेरे, डॉ. दीप्ती पावशेरे, मंगल पुजारी, माजी सैनिक सुनील पुजारी आदींची उपस्थिती होती. सुनीता पावशेरे यांचा हा सन्मान उमरगा तालुक्यासाठी आणि विशेषतः ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्राम विकासाच्या दिशेने त्यांचे हे कार्य इतरांसाठी दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**आरंभ मराठी | पळसप**

मुरूड येथील श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मुख्याध्यापक बाबू थॉमस व समन्वयक रामेश्वर शेटे यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी भारतीय स्वतंत्र्य लढ्यात टिळकांनी दिलेल्या योगदानाची माहिती रामेश्वर शेटे यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमावेळी राजेश बावळे , बालाजी भिसे , प्रशांत कुलकर्णी , आदित्य सिंग , उमेश मारकड , नितीन एम. जी. , दावेशकुमार साहू , राजेश आर .तसेच बबीता गिरी , शांती मार्डी ,गीता फेरे , अर्चना पाटील , ज्योती वांगस्कर , श्रीदेवी माशाळकर , संगीता बिटले ,ज्योती ढेकणे , संध्या माळी , आकांक्षा लोमटे , अश्विनी नाडे , उषा नाईकनवरे , क्लॅरम्मा जेकप , महादेवी देशमुख , रुचिता इरपतगीरे, जयश्री जाधव, श्रद्धा शितोळे, बबीता सिंग, सना पठाण , प्रगती कुंभार सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# शारदीय नवरात्र महोत्सवाच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

## यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांना दिले निर्देश



**आरंभ मराठी | तुळजापूर**

सप्टेंबरमध्ये साजरा होणाऱ्या शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांनी विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेतला. नवरात्र महोत्सवात दरवर्षी लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरला येतात. यावर्षीही मोठी गर्दी लक्षात घेऊन आरोग्य, स्वच्छता, वाहतूक, वीज, पाणी आणि सुरक्षेच्या दृष्टीने तयारी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले. आरोग्य विभागाकडून यंदा अधिक प्रथमोपचार केंद्रांची उभारणी करण्यात येणार असून, आपत्कालीन रुग्णवाहिकांची संख्या वाढवली जाईल. भाविकांची आरोग्याच्या दृष्टीने कोणतीही अडचण उद्भवू नये यासाठी डॉक्टर, नर्स आणि वैद्यकीय कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. तुळजापूर नगरपालिकेच्या वतीने भाविकांसाठी शहरात पुरेशा प्रमाणात शौचालये, पाणपोया आणि कचरा व्यवस्थापन यासाठी नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छता मोहीमेस विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून भाविकांना शुद्ध, स्वच्छ आणि ताजे अन्न मिळावे यासाठी हॉटेल व्यवसायिकांवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. किचनची स्वच्छता, अन्न भेसळ तपासणी व शिस्तबद्ध सेवा यावर भर दिला जाईल. हॉटेल व्यावसायिकांकडून भाविकांना चांगली सेवा मिळावी याची विशेष खबरदारी घेतली जाईल. तसेच राज्य परिवहन महामंडळाकडून अतिरिक्त बसेस चालवण्याची व बस स्थानकात स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्याची तयारी सुरू आहे. प्रादेशिक परिवहन विभागाकडून अवैध प्रवासी वाहतूक व जुनी, अपायकारक वाहने यांच्यावर कारवाई केली जाईल. पोलीस विभागाकडून गर्दी नियंत्रणासाठी शहरात विविध ठिकाणी चेकपोस्ट उभारण्यात येणार असून, वाहतुकीस अडथळा होणार नाही याची विशेष दक्षता घेतली जाणार आहे. यंदाच्या महोत्सवात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री येण्याची शक्यता असल्याने आवश्यक त्या सुरक्षा आणि एस्कॉर्टच्या व्यवस्थेबाबतही सविस्तर चर्चा झाली.

### महोत्सवाचा मुख्य उद्देश स्वच्छता आणि सुरक्षितता

या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार म्हणाले की, ''यावर्षीचा शारदीय नवरात्र महोत्सव 'स्वच्छता व आरोग्य' या संकल्पनेवर आधारित असेल. देवीच्या दर्शनासाठी आलेला प्रत्येक भाविक सुखरूप घरी परत जाईपर्यंत त्याची काळजी घेणे ही आमची जबाबदारी आहे.

### बैठकीला यांची उपस्थिती


या आढावा बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक शफकत आमना, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, तहसीलदार तथा व्यवस्थापक प्रशासन अरविंद बोळंगे, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, तसेच महंत व पुजारी मंडळाचे अध्यक्ष उपस्थित होते. शारदीय नवरात्र महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी समन्वय साधत काम करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागीय कार्यालयाचे रविवारी बीडमध्ये उद्घाटन

## मराठवाड्यातील खासदार-आमदारांना निमंत्रण,उपस्थित राहण्याचे आवाहन

**आरंभ मराठी | धाराशिव**

मराठा समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व सामाजिक उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागीय कार्यालयाचा भव्य शुभारंभ रविवार, २७ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता बीड येथे होणार आहे.या सोहळ्यासाठी मराठवाड्यातील खासदार, आमदारांना निमंत्रण देण्यात आले असून, काही आमदारांनी या कार्यालयासाठी आमदार वेतनातून मदत केली आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून



मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील लाभार्थ्यांना आता योजनांचा थेट लाभ मिळणार असून, व्यवसाय, स्वयंरोजगार आणि आर्थिक मदतीसाठी आवश्यक असलेल्या योजना अधिक



गतिमानपणे राबवल्या जाणार आहेत. हा कार्यक्रम बीड शहरातील हीना हॉटेल समोरील आयसीआयसीआय बँकेच्यावर जालना रोड येथे होणार आहे.कार्यक्रमानंतर सकाळी ११:०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह येथे महामंडळ लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या उद्घाटन सोहळ्यास मराठवाड्यातील सर्व लोकप्रतिनिधींना खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच मराठा समाजातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, उद्योजक, महिला प्रतिनिधी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्यासह स्व.अण्णासाहेब पाटील फाउंडेशनचे बीड जिल्हाध्यक्ष रवी शिंदे, धाराशिव जिल्हाध्यक्ष खंडू भारतराव राऊत, सदस्य सचिन शिंदे यांनी केले आहे.

### मराठवाड्यातील तरुणांना उद्योगाच्या संधी

या उपक्रमामुळे मराठवाड्यातील हजारो तरुणांना रोजगार व उद्योगाच्या नव्या संधी प्राप्त होणार असून, मराठवाडा विभागीय कार्यालय हे या दिशेने मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास महामंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात येत आहे.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
आपलं धाराशिव
गुरूवार, दि. 24 जुलै 2025

# इन्स्टाग्राम व ऑनलाइन चॅटमुळे सुखी संसारात पडतोय मिठाचा खडा

## सोशल मीडिया ठरतोय नवरा-बायकोतील विसंवादाचे कारण

### नात्यातील संवाद कमी होत चालल्यामुळे कुटुंबव्यवस्थेलाच तडे



अभिजित साळुंके | आरंभ मराठी

लोहारा-पती-पत्नीचे नाते म्हणजे विश्वासाचे आणि स्नेहाचे नाते असते. सोशल मीडिया अर्थात व्हॉटस्ॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामसह इतर सोशल मीडियामुळे मात्र नवरा-बायकोमधील विश्वासाच्या नात्यात वाद वाढू लागले आहेत. संवाद कमी होत असून, अनेकांचे वैवाहिक आयुष्य मोबाइलमुळे उद्ध्वस्त होत आहे. काही नाती तर अगदी घटस्फोटापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे. लग्नानंतर पती- पत्नीमध्ये छोट्या-छोट्या कारणांवरून वाद व भांडणे होतात. अगदी संसार तुटण्याच्या पायरीवर येतो. तो पुन्हा जोडण्यासाठी पती किंवा पत्नीकडून भरोसा सेलकडे अर्ज केल्यास मोफत समुपदेशन करून संसार जुळविण्यासाठी प्रयत्न केले जातात. दरम्यान, नवरा आणि बायको यांच्यातील संवाद कमी झाल्यामुळे त्याचा परिणाम मुलांवरदेखील होण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळे मोबाइलचे दुष्परिणाम आता हळूहळू धोकादायक ठरत आहेत.

#### रात्री मोबाइलपासून दूर राहिलेले बरे

दिवसभर कामानिमित्त घराबाहेर असलेले पती-पत्नी रात्री घरी एकत्र असतात. अशा वेळी एकमेकांशी, मुलांशी घरातील व्यक्तींशी संवाद साधत काही गोष्टी आपण ऐकून घेतल्या पाहिजे. त्या संवादाने नाते बहरते. मात्र, अनेक घरांत रात्रीच्या वेळी प्रत्येक जण आपापल्या मोबाइलमध्ये दंग असतात; परंतु यातूनच नाते दुरावते. त्यामुळे रात्रीच्या वेळी मोबाइलचा वापर कटाक्षाने टाळावा, तसेच रात्री उशिरापर्यंत मोबाइल पाहणे डोळ्यासाठी व आरोग्यासाठीही घातक ठरते.

#### काही प्रकरणे कोर्टाकडे वर्ग

काही प्रकरणे पोलिसांकडे आणि कोर्टाकडे वर्ग केली आहेत. पती- पत्नीमधील वादाची तक्रार आल्यानंतर समुपदेशाद्वारे ती प्रकरणे निकाली काढण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, काही प्रकरणात समुपदेशन करून मार्ग निघत नसल्याने, शेवटी गुन्हा दाखल होतो.

#### भरोसा सेलमुळे काही जोडपी पुन्हा एकत्र

कौटुंबिक, वैवाहिक वादातून दुरावलेली जोडपी हिन्याला भरोसा सेल कक्षाद्वारे करण्यात येत असलेल्या समुपदेशनाद्वारे एकत्र येतात. यात भरोसा सेलला काही जोडप्यांचे मनोमिलन करण्यात यश येत आहे.

#### काही प्रकरणांचा निपटारा

भरोसा सेलच्या माध्यमातून तक्रार दाखल केलेल्या काही अर्जाची चौकशी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. सेलकडे दाखल होत असलेल्या प्रकरणांमध्ये काही प्रकरणाचा निपटारा पोलिसांकडून केला जातो. यात पती-पत्नीमधील ताणलेले, दुरावलेले नातेसंबंध पुन्हा एकत्र करण्याचे काम केले जाते.

#### मोबाईलमुळेच अनेक संसार उध्वस्त

सुखी संसारात विष कालविण्याचे काम मोबाइल करत असल्याचे समोर आले आहे. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे पती-पत्नीच्या नात्यामधील गोष्ट घटस्फोटापर्यंत जाऊन ठेपल्याच्या अनेक घटना घडतात. तक्रारींमध्ये सतत फोनवर बोलणे, सोशल मीडियावर जास्त वेळ घालविणे, या सर्व कारणांमुळे वाद होत आहेत. त्यामुळे याबाबत आवश्यक काळजी घ्यायला हवी.

# पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत तुळजापूर शहरातील युवकांचा शिवसेनेत प्रवेश



आरंभ मराठी | तुळजापूर

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत तुळजापूर शहरातील आणि तालुक्यातील असंख्य युवकांनी शिवसेना (शिंदे गट) पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी सौरभ भोसले यांच्यासोबत शुभम दहीहंडे,अर्जुन परदेशी,अनिमेष बर्वे,आफताब तांबोळी,आसिफ तांबोळी,तुषार दहीहंडे,आकाश बर्वे,अनिकेत बर्वे,महफूज बागवान,सिद्धार्थ दहीहंडे,समर्थ लोंढे,अबरार बागवान,लखन डावखरे,निलेश देवकर,रोहित भोसले,ओम मुकेरकर,फैजान सिद्दिकी,रेहान बागवान, दुर्गेश वराडे,आलफाज तांबोळी,हरामत खान,आलिम शेख,सचिन गायकवाड,जावेद शेख,प्रवीण तिकोणे,सहदेव हुचे,दर्शन जुमाळे,सायबा नवगिरे,गणेश नवगिरे,मेघराज परदेशी या महत्त्वपूर्ण युवकांनी तसेच त्यांच्यासोबत असंख्य युवकांनी शिवसेना पक्षामध्ये जाहीर प्रवेश घेतला. यावेळी उपनेते ज्ञानराज चौगुले सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते तालुकाध्यक्ष अमोल जाधव शहराध्यक्ष बापुसाहेब भोसले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खेड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे ज्यु.आय ए.एस परीक्षेत यश




आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील खेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने ज्युनिअर आय.ए.एस.परीक्ष घवघवीत यश संपादन केले. परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तर व राज्यस्तरावर यश मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला. त्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या सत्रात या परीक्षा सत्रात घेण्यात आल्या. यामध्ये मृण्मयी अमोल सरवळे -जिल्ह्यात ७ वी, राज्यात १४ वी, दर्शन अमृत लोमटे - जिल्हयात २२ वा केंद्रात प्रथम व कैवल्य विपीन गरड -याने राज्यात १५ वा जिल्हयात १० वा क्रमांक मिळवून यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविंद्र वीर ( पाटील ), शा . व्य समिती सदस्य रविंद्र टिकले , किशोर लोमटे , प्रदीप दांगट , ग्रा. पं सदस्या सौ . अनुराधा लोमटे यांच्या हस्ते पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले झाला. यावेळी सर्व शिक्षक व पालक यांची उपस्थिती होती.

# वादग्रस्त कृषीमंत्री कोकाटे यांचा राजीनामा घ्या

### संजय दुधगावकर यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

आरंभ मराठी | धाराशिव



शेतकऱ्यांच्या बाबत वादग्रस्त विधान बघणारे आणि विधानसभेत रमी खेळणारे राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात श्री. दुधगावकर यांनी म्हटले आहे की, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी यापूर्वीच आपल्या विविध विधानांनी संपूर्ण राज्यात भरघोस प्रसिद्धी मिळविलेली आहे. शेतकऱ्यांना अर्वाच्च भाषेत बोलून अपमानित करणे असो किंवा पंचनामा करण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेश देतानाची अरेरावी असो, त्यांचे वादग्रस्त वक्तव्य संपूर्ण महाराष्ट्राने ऐकले आहे. अधिवेशन सुरु असताना सभागहात चक्क पत्यांचा रमी गेम खेळतानाचा व्हिडीओ प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाला आहे. माणिकराव कोकाटे यांच्या विविध वक्तव्य व कृतीमुळे राज्यातील जनतेकडून त्यांच्या विषयी तीव्र रोष वारंवार व्यक्त होत असून तो वाढत चालचा आहे. त्यामुळे कृषी मंत्री कोकाटे यांचा राजीनामा घेण्यात यावा व महाराष्ट्राची बदनामी थांबवावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगांवकर यांनी केली आहे.

# समाजरत्न पुरस्कारासाठी संभाजी ब्रिगेडचे आण्णासाहेब पवार यांची निवड

### हैदराबाद येथे ८ ऑगस्ट रोजी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा तालुक्यातील सामाजिक चळवळीतील झुंजार नेतृत्व आणि संभाजी ब्रिगेडचे उमरगा तालुका अध्यक्ष शिवश्री आण्णासाहेब पवार यांना त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत मित्र परिवार ग्रुप तर्फे समाजरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मराठा आरक्षणाच्या लढ्यात आंदोलनात सातत्याने सक्रिय असणारे, जनतेच्या हक्कांसाठी सामाजिक लढे लढणारे, युवक, विद्यार्थी, महिलांच्या विविध समस्या व प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारे आण्णासाहेब पवार हे उमरगा तालुक्यातील विविध स्तरांवर सक्रिय राहून सामाजिक समरसतेसाठी कार्यरत आहेत. त्यांनी ग्रामीण भागातील युवकांना संघटित करून सामाजिक जागृतीचा लढा उभा केला आहे. हैदराबाद येथे सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मित्र परिवार ग्रुपने त्यांच्या या कार्याची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करत संपूर्ण तालुक्याच्या सामाजिक क्षेत्राला एक नवा प्रेरणास्रोत दिला आहे. ८ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. या सन्मानाबद्दल विविध सामाजिक कार्यकर्ते, युवा वर्ग, वंचित घटक, तसेच पवार यांचे सहकारी यांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# वादळी वाऱ्याने शेतकऱ्याचे नुकसान



आरंभ मराठी | लोहारा

सोमवारी दुपारी झालेल्या वादळीवाऱ्यामुळे लोहारा तालुक्यातील करजगाव शिवारातील आरती किशोर साळुंके व दिपक अशोकराव जवळगे यांच्या शेतातील सोलर पंप चे पॅनल उडून गेले. यामध्ये शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे व वादळी वाऱ्यामुळे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शासन स्तरावर याचा पंचनामा करून तात्काळ मदत मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

### १८३ रक्तदात्यांनी रक्तदान करून दिल्या शुभेच्छा





आरंभ मराठी | नळदुर्ग

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नळदुर्ग येथे भारतीय जनता पार्टी नळदुर्ग शहर व ग्रामीण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी तब्बल १८३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. २२ जुलै रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नळदुर्ग येथे भारतीय जनता पार्टी नळदुर्ग शहर मंडळ व नळदुर्ग तालुका ग्रामीण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लोकमान्य वाचनालयाच्या सभागृहात हे रक्तदान शिबीर पार पडले. या रक्तदान शिबिरात नळदुर्ग शहर तसेच ग्रामीण भागातील रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येने रक्तदान केले. रक्तदान मोठया प्रमाणात यशस्वी व्हावे यासाठी भारतीय जनता पार्टी नळदुर्ग शहर मंडळाचे अध्यक्ष बसवराज धरणे व नळदुर्ग तालुका ग्रामीण मंडळाच्या अध्यक्षा रंजना विलास राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठे परीश्रम घेतले. या रक्तदान शिबिरात १८३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्त संकलन करण्याचे काम सोलापुर येथील डॉ. हेगडेवार रक्तपेढी या रक्त पेढीने केले. प्रारंभी तुळजापुर श्री तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुनिल चव्हाण यांच्या हस्ते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे, नय्यर पाशा जगीरदार, भाजपचे नळदुर्ग शहर मंडळचे अध्यक्ष बसवराज धरणे, नळदुर्ग ग्रामिण मंडळाच्या अध्यक्षा रंजना राठोड, विलास राठोड, धीमाजी घुगे, सुधीर हजारे,श्रमिक पोतदार, गणेश मोरडे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांना जयंतीनिमित्त अभिवादन



आरंभ मराठी | धाराशिव

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मोलाची कामगिरी करणाऱ्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी देशमुख म्हणाले की, लोकमान्य टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यात झाला. ते एक महान समाजसुधारक, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' अशी गर्जना करून संपूर्ण देशात स्वातंत्र्याची चळवळ चेतवली. टिळकांनी 'केसरी' आणि 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरू करून जनतेमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण केली. शिवजयंती आणि गणेशोत्सव यासारखे सार्वजनिक सण सुरू करून त्यांनी समाजाला एकत्र आणले आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढवली. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, या विश्वासाने टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. त्यांनी 'गीतारहस्य' हे ग्रंथलेखन करून लोकांमध्ये कर्मयोगाची भावना निर्माण केली. त्यांचे विचार आजही आपल्याला प्रेरणा देतात. त्याग, देशप्रेम, स्वाभिमान आणि एकजूट या मूल्यांची शिकवण ते आपल्याला देतात. याप्रसंगी कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ विभागाचे स्टाफ सेक्रेटरी प्रा सचिन चव्हाण यांनी केले तर आभार प्रा विवेकानंद चव्हाण यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.